जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६५२ दिनांक - २८/०८/२०२३**

दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १,गुन्हे शाखा,पुणे शहर

## एकुण ४९७० किलो लुज बनावट पनीर साठा पकडुन कारवाई केले बाबत

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांना खबर मिळाली की, कर्नाटक येथुन बनावट पनीर टेम्पो मधुन पुणे येथे आणले जाते व ते पुणे शहरातील अनेक छोटया-मोठया दुकानात हॉटेल मध्ये दिले जाते.

दिनांक ०५/०७/२०२३ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अशोक इंदलकर व पथकाकडील अधिकारी व अंमलदार यांनी सदरचा टेम्पो हा मा.वरिष्ठांचे परवानगीने कात्रज चौक पुणे शहर येथे अन्न व औषध प्रशासन कडील अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती क्रांती बारवकर व पथक तसेच पंचांसह सापळा रचुन टाटा कंपनीचा टेम्पो हा ताब्यात घेतला व अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती क्रांती बारवकर यांनी पंचांसह नमुद टेम्पोची पाहणी केली असता त्यामध्ये बॉक्समध्ये एकुण ४,९७० किलो लुज पनीर साठा मिळुन आला. सदरचा माल हा अन्न सुरक्षा अधिकारी यांनी पंचनामा करुन जप्त केला असुन त्या माला पैकी तपासणी करीता सॅम्पल घेण्यात आले आहेत.सदरचे सॅम्पल हे नॅशनल ॲग्रीकल्चरल ॲन्ड फुड ॲनालेसिस ॲन्ड रिसर्च इंन्स्टीटयुट (**Nafari**) बाणेर, पुणे येथील लॅबला पाठविले.

सदर जप्त पनीर मधील काही पॅकेट मधील पनीर हे भेसळयुक्त असल्याचा अहवाल नुकताच प्राप्त झाला असुन त्या भेसळयुक्त व मानवी शरीरास घातक असलेल्या १० लाख रुपये किंमतीचा ४,९७० किलो लुज पनीर नाश करण्यात येत असुन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत असलेबाबत अन्न व औषध प्रशासन विभाग, मोशी, पुणे यांनी गुन्हे शाखा, पुणे शहर कळविले आहे.

सदरची कारवाई पुणे शहरचे मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे १) श्री.सुनिल तांबे, यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१,गुन्हे शाखा, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक इंदलकर, सहा.पोलीस निरीक्षक नरेंद्र पाटील, पोलीस उप निरीक्षक शाहिद शेख, पोलीस अंमलदार सुमित ताकपेरे, महेश पाटील दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी केली आहे.